पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

अ प्रभाग समिती

सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक 02]

दिनांक : 08/05/2018 वेळ : सकाळी 11.30 वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे मे 2018 ची मासिक सभा मंगळवार दिनांक 08/05/2018 रोजी सकाळी 11.30 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सभापती |
| 2. | मा. केशव हनुमंत घोळवे | सदस्य |
| 3. | मा. तुषार रघुनाथ हिंगे | सदस्य |
| 4. | मा. यादव मिनल विशाल | सदस्या |
| 5. | मा. प्रमोद कुटे | सदस्य |
| 6. | मा. राजू मिसाळ | सदस्य |
| 7. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या / उपमहापौर |
| 8. | मा. बाबर शर्मिला राजू | सदस्या |
| 9. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 10. | मा. कोमल दिपक मेवानी | सदस्या |
| 11. | मा. सावंत राजेश पोपट | स्वीकृत सदस्य |
| 12. | मा. कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |

याशिवाय श्री. मंगेश चितळे – मा. क्षेत्रीय अधिकारी, श्री. विशाल कांबळे – मा. कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा , श्री. आर.के.लटपटे – प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री संजय काशीद, श्री. संजय तुपसाखरे, श्री. एम.आय.खोंद्रे, श्री लक्ष्मीकांत कोल्हे, श्री. सुभाष काळे, श्री अनिल शिंदे - उपअभियंता , श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, , श्री. एस.जे. हरिदास , श्री. पाटील एस.पी. - कनिष्ठ अभियंता, श्री.डी.जी.कांबळे – उदयान सहाय्यक इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, अनुराधा गणपत गोरखे यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली. तदनंतर मागील दि. 13/3/2018 रोजीचा अ प्रभाग समितीचा सभावृत्तांत , दि. 26/4/2018 रोजी झालेल्या विशेष सभेचा सभावृत्तांत [ स्वीकृत सदस्य निवड ] तसेच दि. 27/4/2018 रोजी झालेल्या विशेष सभेचा सभावृत्तांत [ मा. सभापती निवड ] कायम करणेत आला.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक** :- २ सन्मा. सदस्य शितल उर्फ विजय गोरख शिंदे यांचा दि. 08/05/2018 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 19 मधील दळवीनगर [ उदयोगनगर ] झोपडपट्टी येथील प्रवेशद्वारावरील लोखंडी कमानीला बरीच वर्षे झाली असून त्याचे लोखंड पुर्णपणे गंजलेले असल्याने त्याचे नुतनीकरण करुन त्यास विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार असे नाव देणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक** :- ३ मा. सभापती अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांचा दि. 08/05/2018 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील मोरवाडी येथील श्रध्दा गार्डन पासून जेकूमा टूल्स आणि गेजेस हा नवीन रस्ता चालू झाला असून या रस्त्याला **कै. उमेश विश्वनाथ जोगळेकर पथ** असे नामकरण करणेस तसेच मोरवाडी एमआयडीसी मधील जेकूमा टूल्स व गेजेस व उमा प्लास्टीक या कंपनी समोरील चौकाला **उदयोजक कै. बळवंत जेजूरीकर चौक** असे नामकरण करणेस मान्यता देणे.

विषय क्रमांक :-४ मा. सभापती अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांचा दि. 08/05/2018 रोजीचा प्रस्ताव

- प्रभाग क्रमांक 10 मधील दत्तनगर परशूराम चौक झोपडपट्टीमध्ये पाईपलाईन टाकणे. भूयारी किंवा बंद पाईप लाईन टाकणे. गटार व पाईपलाईन क्रॉस होणार नाही अशा पध्दतीने करणे.
- खाणीमध्ये भराव टाकून बुजविणे व सुशोभिकरण करणे म्हणजे मुलांना खेळण्यासाठी क्रिडांगण तयार करणे.
- अ क्षेत्रीय प्रभाग क्रमांक 10, 14, 15 व 19 मधील सर्व झोपडपट्टयांमधील नळ पाईप, गटारे लाईन टाकणे.
- पावसाळा सुरु होण्यापुर्वी सर्व नाले सफाई करुन घेणे.
- प्रभाग क्रमांक 10 दत्तनगर येथील दवाखाना झो.नि.पु. इमारतीचे स्ट्रकचरल ऑडीट करुन नवीन इमारत बांधणे.

विषय क्रमांक :- ५ सन्मा. सदस्या शर्मिला बाबर यांचा दि. 08/05/2018 रोजीचा प्रस्ताव

सेक्टर 28, अंबा चौक, प्राधिकरण, निगडी, पुणे 44 येथे राहणा-या सुसंगती ज्येष्ठ नागरीक संघाचे सभासदांनी नम्र विनंती केली आहे की, ते राहात असलेल्या परिसरात प्लॉट नंबर 89 ते प्लॉट नंबर 136 यांना जोडणा-या इंग्रजी सी [C] आकाराच्या रस्त्याला **सुसंगती मार्ग** असे नामकरण करणेस मान्यता देणे.

विषय क्रमांक:- ६ मा. सभापती अनुराधा गोरखे , अ प्रभाग समिती यांचा दि. 08/05/2018 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 दत्तनगर झोपडपट्टी येथील धोबी घाटाशेजारी यापुर्वी 25 सीटसची दोन सुलभ शौचालये बांधणेत आलेली आहेत. तसेच 17 सीटसचे एक कम्युनिटी टॉयलेट ही नव्यानेच बांधणेत आलेले आहे. याच ठिकाणी मनपाने यापुर्वी 10 सीटसचे अक्काप्रायव्ही स्वरुपाचे एक शौचालय बांधलेले असून ते जुने झाले असून त्याचा सेप्टीक टँक वारंवार लिक होत असून मैला ब-याचदा रस्त्यावर येत असतो व आरोग्यास हानिकारक परिस्थिती निर्माण होत असते. सदरचे ठिकाणी नागरीकांचे सुविधेचे दृष्टीने एकूण 67 सिटस् उपलब्ध असून सदरचे धोकादायक अवस्थेतील 17 सीटसचे शौचालय लवकरात लवकर निष्कासित करणेस मान्यता देणे.तसेच अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृहामध्ये वातानुकूलन व्यवस्था व प्रोजेक्टर बसविणेस मान्यता देणे.

विषय क्रमांक:- ७ मा.सौ.शैलजा अविनाश मोरे, उपमहापौर यांचा दिनांक ८/५/२०१८ रोजीचा प्रस्ताव.
प्र.क्र.१५ मध्ये से.२६ येथे मल्लिकार्जून मठ आहे, त्याच्या कडेला एक मुतारी ब्लॉक् पुरुषांसाठी आहे. सदर मुतारी ब्लॉकचा मंदिरात येणा-या जाणा-या भाविकांना फार मोठया प्रमाणात वास येत आहे. याबाबत अनेक भाविकांनी व असंख्य् नागरिकांनी मागणी केल्याने सदर मुतारी पाडणेस मान्यता देणे तसेच सदर ठिकाणी स्त्री व पुरुषांसाठी फायबरची मुतारी संजय गाळे ग्रेड सेपरेटरच्या कोप-यात बसविणेस मान्यता देणे.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले.

ठराव क्रमांक 02
दिनांक 08/05/2018
सुचक: मा. शैलजा मोरे

विषय क्रमांक 1
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. मिनल यादव

संदर्भ :- सन्मा. सदस्या/ उपमहापौर शैलजा मोरे यांचेकडील दि. 27/3/2018 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 15 निगडी प्राधिकरण मधील सेक्टर 28 जिव्हेश्वर हौसिंग सोसायटीजवळ नवीन बस स्टॉप बसविण्यात आलेला आहे. सदरच्या बसस्टॉपला **श्री. जिव्हेश्वर बसस्टॉप** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 03
दिनांक 08/05/2018
सुचक: मा. शितल उर्फ विजय शिंदे

विषय क्रमांक 2
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. मिनल यादव

संदर्भ :- सन्मा. सदस्य शितल उर्फ विजय शिंदे यांचेकडील दि. 8/5/2018 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 19 मधील दळवीनगर [ उदयोगनगर ] झोपडपट्टी येथील प्रवेशद्वारावरील लोखंडी कमानीला बरीच वर्षे झाली असून त्याचे लोखंड पुर्णपणे गंजलेले असल्याने तसेच त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असल्याने त्याचे नुतनीकरण करुन त्यास **विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार** असे नाव देणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 04
दिनांक 08/05/2018
सुचक: मा. केशव घोळवे

विषय क्रमांक 3
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- मा. सभापती अनुराधा गोरखे यांचेकडील दि. 8/5/2018 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 मधील मोरवाडी येथील श्रध्दा गार्डन पासून जेकूमा टूल्स आणि गेजेस हा नवीन रस्ता चालू झाला असून या रस्त्याला **कै. उमेश विश्वनाथ जोगळेकर पथ** असे नामकरण करणेस तसेच मोरवाडी एमआयडीसी मधील जेकूमा टूल्स व गेजेस व उमा प्लास्टीक या कंपनी समोरील चौकाला **उदयोजक कै. बळवंत जेजूरीकर चौक** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 05
दिनांक 08/05/2018
सुचक: मा. केशव घोळवे

विषय क्रमांक 4
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- मा. सभापती अनुराधा गोरखे यांचेकडील दि. 8/5/2018 रोजीचा प्रस्ताव

- प्रभाग क्रमांक 10 मधील दत्तनगर परशूराम चौक झोपडपट्टीमध्ये पाईपलाईन टाकणे. भूयारी किंवा बंद पाईप लाईन टाकणे. गटार व पाईपलाईन क्रॉस होणार नाही अशा पध्दतीने करणेस मान्यता देत आहे.
- खाणीमध्ये भराव टाकून बुजविणे व सुशोभिकरण करणे म्हणजे मुलांना खेळण्यासाठी क्रिडांगण तयार करणेस मान्यता देणेत येत आहे.
- अ क्षेत्रीय प्रभाग क्रमांक 10, 14, 15 व 19 मधील सर्व झोपडपट्टयांमधील नळ पाईप, गटारे लाईन टाकणे.
- पावसाळा सुरु होण्यापुर्वी सर्व नाले सफाई करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.
- प्रभाग क्रमांक 10 दत्तनगर येथील दवाखाना झो.नि.पु. इमारतीचे स्ट्रकचरल ऑडीट करुन नवीन इमारत बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 06
दिनांक 08/05/2018
सुचक: मा. शर्मिला बाबर

विषय क्रमांक 5
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शैलजा मोरे

संदर्भ :- सन्मा. सदस्या शर्मिला बाबर यांचेकडील दि. 8/5/2018 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 15 मधील सेक्टर 28, अंबा चौक, प्राधिकरण, निगडी, पुणे - ४४ येथे राहणा-या सुसंगती ज्येष्ठ नागरीक संघाचे सभासदानी नम्र विनंती केली आहे की ते राहात असलेल्या परिसरात प्लॉट नंबर 89 ते प्लॉट नंबर 136 यांना जोडणा-या इंग्रजी सी [C] आकाराच्या रस्त्याला **सुसंगती मार्ग** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 07
दिनांक 08/05/2018
सुचक: मा. केशव घोळवे

विषय क्रमांक 6
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. तुषार हिंगे

संदर्भ :- मा. सभापती अनुराधा गोरखे यांचेकडील दि. 8/5/2018 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 10 दत्तनगर झोपडपट्टी येथील धोबी घाटाशेजारी यापुर्वी 25 सीटसची दोन सुलभ शौचालये बांधणेत आलेली आहेत. तसेच 17 सीटसचे एक कम्युनिटी टॉयलेट ही नव्यानेच बांधणेत आलेले आहे. याच ठिकाणी मनपाने यापुर्वी 10 सीटसचे अक्काप्रायव्ही स्वरुपाचे एक शौचालय बांधलेले असून ते जुने झाले असून त्याचा सेप्टीक टँक वारंवार लिक होत असून मैला ब-याचदा रस्त्यावर येत असतो व आरोग्यास हानिकारक परिस्थिती निर्माण होत असते. सदरचे ठिकाणी नागरीकांचे सुविधेचे दृष्टीने एकूण 67 सिटस् उपलब्ध असून सदरचे धोकादायक अवस्थेतील 17 सीटसचे शौचालय लवकरात लवकर निष्कासित करणेस मान्यता देणे.

तसेच अ क्षेत्रीय कार्यालयातील राजमाता जिजाऊ सभागृहामध्ये वातानुकूलन व्यवस्था व प्रोजेक्टर बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 08
दिनांक 08/05/2018
सुचक: मा. शैलजा अविनाश मोरे

विषय क्रमांक 7
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबार

संदर्भ :- मा. शैलजा अविनाश मोरे,उपमहापौर यांचेकडील दि. 8/5/2018 रोजीचा प्रस्ताव

प्र.क्र.१५ मध्ये से.२६ येथे मल्लिकार्जून मठ आहे, त्याच्या कडेला एक मुतारी ब्लॉक् पुरुषांसाठी आहे. सदर मुतारी ब्लॉकचा मंदिरात येणा-या जाणा-या भाविकांना फार मोठया प्रमाणात वास येत आहे. याबाबत अनेक भाविकांनी व असंख्य् नागरिकांनी मागणी केल्याने सदर मुतारी पाडणेबाबत मागणी केलेली आहे त्यास मान्यता देणे तसेच सदर ठिकाणी स्त्री व पुरुषांसाठी फायबरची मुतारी संजय गाळे ग्रेड सेपरेटरच्या कोप-यात बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती, अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले

[ अनुराधा गणपत गोरखे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्र. अक्षेका/11/कावि/922/2018 दि 25/5/2018

प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ------------------------